ePaper

## अनुयायी तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणी आसाराम बापू दोषी



वर्ष - 6 । अंक - 285 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- जगतापांच्या बालेकिल्ल्यातून राष्ट्रवादीचा परिवर्तनाचा एल्गार
- पिंपरी-चिंचवडमध्ये आता 'रामराज्य'!
- संसदेत महाराष्ट्राचा आवाज बुलंद करा
- फोडा आणि राज्य करा, हेच काँग्रेसचे धोरण


www.mahaenews.com | ।मंगळवार , दि. 31 जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# थकबाकीदार महापालिकेच्या रडारवर!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने मालमत्ता कर वसुलीचा 600 कोटींचा टप्पा केला पार

। पिंपरी । महाईन्यूज ।

**औद्योगिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपरी चिंचवड मधील महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागानं 'रेकॉर्ड ब्रेक' वसुली केली आहे. कर संकलन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या जानेवारी महिन्यातच महापालिकेच्या तिजोरीत तब्बल ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्ता कर जमा झाला आहे.**



तसेच अद्याप १ लाख ६० हजार निवासी मालमत्ताधारकांकडे तब्बल ४५० कोटी रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे. उर्वरित मालमत्ता धारकांनी मिळकत कर भरून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी केले आहे. दरम्यान, दुसरीकडे मालमत्ता कराची मोठी थकबाकी असणारे मालमत्ता धारक महानगरपालिकेच्या रडारवर आले आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात ५ लाख ९१ हजार मिळकतींची नोंद आहे. यंदाच्या २०२२-२३ या आर्थिक वर्षात कर आकारणी व कर संकलन विभागाने १००० कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. आर्थिक वर्ष सुरू झाल्यापासून म्हणजेच १ एप्रिल २०२२ पासून आतापर्यंत ६०० कोटी रुपयांचा मालमत्ता कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाने जाहीर केलेल्या विविध सवलत योजना आणि जप्तीच्या मोहीमेमुळे ही रेकॉर्ड ब्रेक वसुली झाली आहे.

तसेच जास्तीतजास्त कर वसुली व्हावी, यासाठी शहरातील थकबाकीदारांना विभागाने नोटीस बजावून जप्तीची मोहीम तीव्र केली आहे. थकबाकीदारांवर सहाय्यक आयुक्त देशमुख यांनी लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे थकीत कर वसूल करण्यास महापालिकेला यश येत आहे. मालमत्ताधारकांनी थकबाकी आणि चालू वर्षाचा कर भरून महापालिकेला सहकार्य करून शहर विकासात योगदान द्यावे,' असे आवाहनही महानगपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### नोटीसा बजावण्यास सुरुवात

कर आकारणी व कर संकलन विभागाने रुपये १० हजार, २५ हजार, ५० हजारपुढे मुळ कर व थकबाकी असलेल्या मालमत्तांना जप्ती पूर्व नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे. या विभागाने चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत नेमक्या किती नोटीस पाठवल्या आहेत...

**10 हजार रुपये पुढील मालमत्ता** – ४४६७९
**25 हजार रुपये पुढील मालमत्ता** – ३६५४९
**50 हजार रुपये पुढील मालमत्ता** – २६७६०
**पाच लाखांपुढील थकीत कर असणाऱ्या मालमत्ता** – १३६०
**आकारणी झाल्यापासून एकदाही मालमत्ता कराचा भरणा न केलेल्या मालमत्ता नोटिसा** – ३८५०

### पाचशेच्या वर मालमत्ता केल्या सील..

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील कर आकारणी व कर संकलन विभागानं आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचे निर्देश व मार्गदर्शनाखाली कठोर भूमिका घेत जप्तीची मोहीम तीव्र केली आहे. या मोहिमेत मोठ्या प्रमाणात सदनिका, व्यावसायिक गाळे जप्त केले जात आहेत. महानगरपालिकेतून प्राप्त आकडेवारीनुसार २८ जानेवारी २०२३ पर्यंत मालमत्ता कर थकबाकी न भरल्यामुळे ५२६ मालमत्ता सील केल्या आहेत. याशिवाय, आतापर्यंत ८ हजार ८३६ जप्ती अधिपत्र तयार केली आहेत. तसेच ३ हजार २२५ मालमत्तांवर जप्ती अधिपत्रानुसार कारवाई केली आहे. जप्ती कार्यवाहीनंतर २ हजार ८१२ मालमत्तांचा कर वसूल झाला आहे. जप्ती कार्यवाहीतून वसूल झालेली कराची रक्कम ही तब्बल ४३ कोटी ६८ लाख २१ हजार २३२ एवढी आहे.

> **आर्थिक वर्षांतील दहा महिन्यांत ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्ता कर वसूल झाला आहे. मात्र, अद्यापही मोठे लक्ष गाठणे बाकी आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ संपण्यासाठी आता फेब्रुवारी व मार्च असे दोन महिने शिल्लक आहेत. या दोन महिन्यात उर्वरीत मालमत्ता करधारकांकडून कर वसुली करण्याचे नियोजन महापालिकेने केल आहे. ज्या करदात्यांनी अद्याप महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरला नाही, त्या नागरिकांनी मालमत्ता कर वसुलीचे १००० कोटींचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी तात्काळ कराचा भरणा करून महापालिकेला सहकार्य करावे.**
> – **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक

> **पिंपरी-चिंचवड महानगरपालिका उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा मालमत्ता कर आहे. वारंवार कर भरण्याचे आवाहन करूनही जे मालमत्ताधारक कर भरत नाही, त्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेत जप्तीची मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. दहा हजार रुपये आणि पंचवीस हजार रुपयांच्या पुढील मालमत्ता जप्तीपूर्व नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे. सर्व जप्ती अधिपत्रांची कडक अंमलबजावणी करण्यात येत आहे. सोसायटी वगळता अन्य ज्या निवासी मालमत्तांकडे एक लाखापेक्षा जास्त थकबाकी आहे, त्यांचे नळ कनेक्शन तोडण्यात येत आहे.**
> – **निलेश देशमुख,** सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग


# विना परवाना लावलेले राजकीय बॅनर हटवण्याचे आदेश

## अतिक्रमण निर्मूलन विभागाचे सहाय्यक आयुक्त राजेश आगळे यांचे निर्देश

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शहरात विनापरवाना लावण्यात आलेले राजकीय पक्षांचे बॅनर, फलक, होर्डींग तात्काळ काढून टाकावेत, असे निर्देश अतिक्रमण निर्मूलन विभागाचे सहाय्यक आयुक्त राजेश आगळे यांनी बीट निरिक्षक आणि अतिक्रमण निरिक्षकांना दिले.**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करुन आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांनी दिले आहे. आचारसंहिता लागू असलेल्या



कार्यक्षेत्रात विनापरवाना राजकीय बॅनर, फलक, होर्डींग्ज अथवा तत्सम जाहिराती असलेले फलक काढून टाकण्यासंबंधी महापालिकेच्या अतिक्रमण पथकामार्फत क्षेत्रीय कार्यालय स्तरावर कारवाई सुरु आहे. ही कारवाई अधिक गतीमान करण्यासाठी आज राजेश आगळे यांच्या उपस्थितीत क्षेत्रीय कार्यालयातील सर्व बीट निरिक्षक, अतिक्रमण निरिक्षक यांची बैठक घेण्यात आली. थेरगाव येथील ग क्षेत्रीय कार्यालयाच्या इमारतीत पार पडलेल्या या बैठकीस विशेष अधिकारी तथा चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय कार्यालयांचे अतिक्रमण निरिक्षक व बीट निरिक्षक उपस्थित होते.

बैठकीत सर्व बीट निरिक्षक, अतिक्रमण निरिक्षकांना आपल्या अधिनस्त असलेल्या कार्यक्षेत्रात वारंवार पाहणी करावी, विनापरवाना राजकीय बॅनर, फलक, होर्डींग्ज अथवा तत्सम जाहिराती असलेले फलक काढून टाकण्यासंबंधी सूचना देण्यात आल्या. दैनंदिन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अतिक्रमण निर्मूलन विभागाकडे पाठविण्याचे आदेश सहाय्यक आयुक्त आगळे यांनी संबंधितांना दिले.

# दिवंगत जगतापांच्या यांच्या बालेकिल्यातून राष्ट्रवादीचा परिवर्तनाचा एल्गार!

## राष्ट्रवादीची मासिक बैठक अजित गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच चिंचवड विधानसभेचे निरीक्षक आ. सुनिल शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात

। पिंपरी । महाईन्यूज
। प्रतिनिधी।

**चिंचवड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची मासिक बैठक शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच चिंचवड विधानसभेचे निरीक्षक आमदार सुनिल शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत दिसून आलेला उत्साह हा संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये आत्मविश्वास भरणारा ठरला आहे.**



या बैठकीत बोलताना चिंचवड विधानसभेचे अध्यक्ष निरीक्षक आमदार सुनिल शेळके यांनी सांगितले की भाजपने आमदार लक्ष्मण जगताप हे हयात असताना व प्रकृतीशी झुंज देत असताना चिंचवड विधानसभेत पोट निवडणूक लागणार या दृष्टीने पोटनिवडणुकीची तयारी चालू केलेली होती. ही गोष्ट अतिशय दुर्दैवी आहे. अशा प्रकारचे राजकारण करणे हे कुठल्या राजकीय संस्कृतीला धरून आहे, असा घणाघात यावेळी त्यांनी भाजपवर केला. तसेच राष्ट्रवादी हाच या निवडणुकीत नैसर्गिक दावेदार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. व राष्ट्रवादीचाच उमेदवार या निवडणुकीत विजयी होईल असा विश्वास देखील बोलून दाखवला.

तसेच गेले ३ दशके राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांनी या शहराचा कायापालट केलेला आहे व मोलाचे योगदान दिले आहे, अनेक कार्यकर्त्यांची मोठी फळी घडवलेली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला मानणारा मतदार या शहरात व चिंचवड मतदार संघात मोठ्या संख्येने आहे. म्हणून ही जागा राष्ट्रवादीलाच मिळेल असा विश्वास व्यक्त केला. तरीही महाविकास आघाडीतील नेते अंतिम निर्णय घेतील असेही त्यांनी म्हटले आहे.

बैठकीचे अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी बोलताना, येत्या महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने ही निवडणूक जिंकणे महत्वाचे असल्याचे सांगत सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यात उत्साह भरला आहे. ज्याप्रमाणे मावळची निवडणूक सुनील शेळके यांनी प्रचंड मताधिक्याने जिंकली तसाच चिंचवड निवडणुकीत देखील विजय मिळवायचा आहे. असेही त्यांनी सांगितले. महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट यांनी आपल्या भाषणात, चिंचवड निवडणुकीसाठी सर्वांनी तयारीला लागण्याचे आवाहन केले तसेच ही निवडणूक आपल्याला कुठल्याही परिस्थितीत जिंकायची आहे असे प्रतिपादन केले. एकंदरीतच चिंचवड पोट निवडणुकीच्या निमित्ताने खुद्द पिंपळे गुरव मधेच राष्ट्रवादीने मोर्सुचे बांधणीस सुरुवात केलेली आहे. कार्यकर्ते संघटनेचे पदाधिकारी झटून कामाला लागल्याचे चित्र दिसत आहे.

### बैठकीला मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती...

यावेळी चिंचवड विधानसभेचे पक्ष निरीक्षक आमदार सुनील शेळके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला शहराध्यक्ष कविताताई आल्हाट, युवक शहराध्यक्ष इम्रान शेख, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे, ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर, माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, अतुल शितोळे, मयूर कलाटे, पंकज भालेकर, विनोद नढे, राजेंद्र जगताप, राजू लोखंडे, अरुण बोराडे, फजल शेख, प्रदेश सरचिटणीस विशाल वाकडकर, विशाल काळभोर, प्रशांत सपकाळ, चिंचवड विधानसभेचे कार्याध्यक्ष श्याम जगताप, तानाजी जवळकर, स्वीकृत सदस्य शिवाजी पाडुळे, पिंपरी भोसरी चिंचवड विधानसभेतील आजी माजी नगरसेवक सर्व पदाधिकारी व महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## महापालिकेतून गावे वगळण्याचा निर्णय प्रशासनासाठी ठरणार डोकेदुखी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही दोन्ही गावे महापालिकेतून वगळण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतल्यानंतर आता शासनाने महापालिकेला पत्र पाठवले आहे. महापालिकेच्या मुख्यसभेने ही दोन्ही गावे वगळण्याचा मुख्यसभेत निर्णय घेऊन हा ठराव शासनाकडे पाठवा असे आदेश दिले आहेत. मात्र, या दोन्ही गावात महापालिकेने केलेला कोट्यावधी रुपयांचा खर्च, प्रस्तावित टीपी स्कीम यामुळे ही गावे महापालिकेतून वगळण्यास प्रशासनाचा त्यास विरोध आहे असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे आता शासनाचे ऐकायचे की आपल्या भूमिकेवर ठाम रहायचे यावरून प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे.

राज्य सरकारने २०१७ मध्ये ११ गावांचा पुणे महापालिकेत समावेश केला. त्यामध्ये फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांचा समावेश आहे. ही गावे महापालिकेत आल्यानंतर गेल्या पाच वर्षात सुमारे २५० कोटी रुपये या गावांमध्ये खर्च झाले आहेत. तर ३९२ कोटी रुपयांच्या मलःनिसारण प्रकल्पामध्ये या दोन्ही गावांमध्ये सुमारे ४२ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच या दोन्ही गावात ३७१ हेक्टरची टीपी स्कीम शासनाने मंजूर केली आहे. पुणे महापालिकेत ३३ वर्षांनंतर टीपी स्कीम होत असताना ही दोन गावे हद्दीबाहेर जात असल्याने मोठे नुकसान होणार आहे. दरम्यान फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावात मिळकतकर चुकीच्या पद्धतीने लागला असल्याने लाखो रुपयांची थकबाकी निर्माण झाली आहे. त्याविरोधात नागरिकांनी तक्रारी सुरू करून ही गावे वगळण्याची मागणी केली.

त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे झालेल्या बैठकीत ही दोन्ही गावे महापालिकेतून वगळण्याचा निर्णय झाला व या दोन्ही गावांची नगर परिषद स्थापन केली जाणार आहे. ही बैठक झाल्यानंतर १५ दिवसात त्याचे आदेश निघणार होते, पण महिना उलटून गेला तरी काहीच होत झाले नव्हते.

## अतिरिक्त पशुसंवर्धन डॉ. धनंजय परकाळे ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होणार

### कार्यक्षम व तांत्रिक विषयातील तज्ज अधिकारी म्हणून ओळख

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



पशुसंवर्धन विभागातील अतिरिक्त आयुक्त डॉ. धनंजय परकाळे, ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर आज सेवानिवृत्त होत आहेत. सन १९८७ पासून विभागात पशुधन विकास अधिकारी ते अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन या पदापर्यंत पोहोचलेले एक कार्यक्षम व तांत्रिक विषयातील तज्ज्ञ अधिकारी म्हणून ओळखले जातात. कोल्हापूर, पुणे, सातारा, अहमदनगर, नाशिक या जिल्ह्यात त्यांनी पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयापासून प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त या पदापर्यंत कामकाज केले व शेवटी १ ऑगस्ट १९ पासून आज अखेर अतिरिक्त शुसंवर्धन म्हणून त्यांनी कामकाज पाहिले.

आपल्या एकूण विभागातील कार्यकाळात अनेक जुन्या पशुसंवर्धन विषयक योजनांची पुनर्रचना, अनुवंशिक सुधारणा कार्यक्रमाची सुरुवात त्यांनीच केली. सध्याच्या पुण्यातील आयुक्तालयाची इमारत उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. बोव्हाईन ब्रीडींग कायद्याचा मसुदा, अनेक पशु शल्यचिकित्सा, हजारो पशु वंध्यत्व निवारण शिबिरातून उपचार, सोबत ग्लँडर्स या महाभयंकर संसर्जन्य आजाराचे निदान त्यांनी महाराष्ट्रात १०० वर्षानंतर पहिल्यांदा केले.

त्याचबरोबर बर्ड फ्ल्यू, लंपी चर्मरोग यांच्या रोग नियंत्रणात त्यांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. पुणे येथे ताथवडे प्रक्षेत्रावर भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा देखील उभारण्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिलेला आहे. राज्यातील पशुपालकांना लिंगवर्गीकृत रेत मात्रा मिळवून देण्यामध्ये देखील त्यांनी मोलाचे काम केले आहे.

पशुप्रजनन शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतले असल्यामुळे त्याचा पुरेपूर वापर आपल्या कार्यकाळात पशुपालकांना कसा होईल यासाठी प्रयत्न केला. कॉलेज जीवनात अत्यंत हुशार व सुवर्णपदकाचे मानकरी राहिले आहेत. सेवाकाळात नेदरलँड, अमेरिकेत दुग्ध व्यवसाय व पशु अनुवंशिक शास्त्राचा अभ्यास दौरा देखील केला होता.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आता 'रामराज्य'!

## » शिंदे-फडणवीस सरकारची आमदार लांडगेंना ताकद!, पिंपरी-चिंचवडचे एकमूखी नेतृत्व करण्याची संधी

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणात भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांचे राजकीय वजन वाढले आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लांडगेंनामोठी राजकीय 'ताकद' दिली असून, शहराचे एकमूखी नेतृत्व करण्याची संधी लांडगे यांना चालून आली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापनेपासून सुरूवातील काँग्रेस, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने एकहाती सत्ता गाजवली. दिवंगत खासदार अण्णासाहेब मगर, मंत्री प्रा. रामकृष्ण मोरे यांनी शहराचे नेतृत्व केले. त्यानंतरच्या काळात राष्ट्रवादीचे 'कारभारी' अजित पवार यांच्याकडे शहराची धुरा आली.

२००२ पासून सलग १५ वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची पिंपरी-चिंचवड महापालिकेत निर्विवाद सत्ता राहीली. २०१४ मध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी राष्ट्रवादीविरोधात स्थानिक नेतृत्वाच्या मुद्यावर बंड केले. त्यामुळे चिंचवड विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादीच्या पराभवाची खरी सुरवात झाली. दरम्यान २०१४ मध्येच भोसरी विधानसभेतील तत्कालीन अपक्ष उमेदवार महेश लांडगे यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार विलास लांडे यांचा पराभव केला. पुढे २०१७ च्या महापालिका निवडणुकीपूर्वी आमदार लांडगे यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये अधिकृत प्रवेश केला.

२०१७ मध्ये झालेल्या महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत 'नको बारामती... नको भानामती... पिंपरी-चिंचवडची धुरा देवू 'राम-लक्ष्मणाच्या हाती" ही निवडणूक प्रचार घोषणा प्रचंड गाजली होती. पिंपरी-चिंचवडकरांनी भाजपा आणि राम-लक्ष्मण जोडीला अर्थात दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांना शहराचे नेतृत्व करण्याची संधी दिली.

२०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडीची सत्ता स्थापन झाली. त्यावेळी शिवसेनेने भाजपाची काडीमोड घेतला आणि राष्ट्रवादी-काँग्रेससोबत महाविकास आघाडी स्थापन केली. त्यामुळे जगताप आणि लांडगे यांना विरोधी बाकावर बसावे लागले. दुर्दैवाने जगताप यांना आजाराने घेरले. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावली. मात्र, जगताप यांनी भाजपासोबत असलेली निष्ठा कायम ठेवली. राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीत जोखीम पत्करुन जगताप यांनी मतदान केले. दि. ३ जानेवारी २0२३ रोजी जगताप यांचे निधन झाले. स्थानिक पातळीवर भाजपाचा 'किंगमेकर' नेता हरपला.

दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदार संघाची पोटनिवडणूक लागली. भाजपा शहराध्यक्ष या नात्याने आमदार लांडगे यांच्यावर 'बिनविरोधची जबाबदारी' देण्यात आली. त्यामुळे भाजपाच्या स्थानिक निर्णय प्रक्रियेत आमदार लांडगे यांचा रोल महत्त्वाचा ठरताना दिसत आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पत्रकार परिषदेत यावर अप्रत्यक्ष शिक्कामोर्तब झाले.

### प्रखर हिंदूत्व आमदार लांडगेंची 'लाईन ऑफ ॲक्शन'

» आमदार लांडगे यांच्या संकल्पनेतून भोसरीत महाराष्ट्रातील सर्वात मोठी इंद्रायणी थडी भरवण्यात आली. त्याचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते झाले. तर समारोप राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते झाला. राज्यातील राजकीय, अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी या महोत्सवाला हजेरी लावली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी लांडगे यांच्या कार्याचे तोंडभरुन कौतूक केले. अयोध्येतील राम मंदिराची प्रतिकृती उभारून लांडगेंनी आपल्या राजकीय वाटचालीची 'लाईन ऑफ ॲक्शन' निश्चित केली आहे. शिवप्रतिष्ठान हिंदूस्थानचे संस्थापक संभाजी भिडे, हिंदू राष्ट्र सेनेने संस्थापक धनंजय देसाई, प्रखर हिंदूत्ववादी अध्यात्मिक गुरू कालिचरण महाराज, विश्व हिंदू परिषदेचे भारतीय सत्संग प्रमुख दादा वेदक, क्षेत्रप्रचारक अण्णा पंडित, गोरक्षक स्वामी शिवशंकर महाराज यांची उपस्थिती ही बाब अधोरेखित करते. प्रखर हिंदूत्ववादी भूमिका आणि राज्यातील शिंदे-फडणवीस सरकाची ताकद यामुळे आमदार महेश लांडगे यांना शहराचे नेतृत्व करण्याची संधी आता चालून आली आहे. त्यामुळे राम-लक्ष्मण जोडी फुटली असली, तरी 'रामराज्य' प्रस्तापित करण्यासाठी आमदार लांडगेंच्या नेतृत्वाला संधी मिळणार, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.


---

# 'इलाज नको पण रांग आवर...

## » थेरगाव रुग्णालयातील परिस्थितीः आरोग्य विभागाचे दुर्लक्ष

।पिंपरी चिंचवड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहराची वाटचाल स्मार्ट सिटीकडे होत असतानाच महापालिकेच्या आरोग्य विभागाचा कारभार मात्र संथगतीनेच सुरु आहे.**



संगणकाच्या जमान्यात पालिकेची रुग्णालये जुन्याच पद्धतीने कारभार हाकताना दिसतायेत. पालिकेच्या थेरगाव रुग्णालयात याचा प्रत्यय रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रोजच येतोय.

विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी दररोज रुग्ण नातेवाईकांबरोबर रुग्णालयात येतात. त्यांना डॉक्टरांकडे जाण्यासाठी केसपेपरची गरज भासते. त्यासाठी रुग्ण अथवा त्यांच्या नातेवाईकांना रांगेत थांबावे लागते. गोरगरिबांना खासगी रुग्णालयातील उपचाराचे दर खिशाला परवडत नसल्यामुळे पर्यायी पालिकेचा दवाखाना जवळ करावा लागतो. मात्र, रुग्णालयात पाय ठेवताच भल्या मोठ्या रांगेने त्यांचे स्वागत होते. केसपेपर काढण्यासाठी वेगळी रंग, पैसे भरण्यासाठी वेगळी रंग, डॉक्टरांकडे वेगळीच रंग अनं औषधांसाठी देखील रांग. या रांगेचा रुग्णांबरोबरच नातेवाईकांना देखील मनस्ताप सहन करावा लागतो.

संगणकाच्या जमान्यात बाहेरील देशांची रुग्णालये हायटेक होताना दिसत असताना, दुसरीकडे एकेकाळची आशिया खंडातील प्रगत पिंपरी चिंचवड महापालिका अजूनही जुन्या बुरसटलेल्या चालीरीती सोडायला तयार नाही. त्यामुळे नागरिकांना ' इलाज नको पण रांग आवर ' असे म्हणण्याची वेळ आली आहे.

---

# चिंचवड पोटनिवडणुक : आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

।पिंपरी ।महाईन्यूज ।

फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीची खरी रंगत आज मंगळवार (दि.३१) पासून वाढणार आहे. आजपासून निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी होणार आहे. तसेच इच्छुक उमेदवारांना उद्यापासून अर्ज दाखल करता येणार असून अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत ७ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे.

चिंचवड विधानसभेचे भारतीय जनता पक्षाचे आमदार लक्ष्मण जगताप यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. त्यानुसार आज दि.३१ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. ८ फेब्रुवारी रोजी अर्जांची छाननी केली जाईल. १० फेब्रुवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २६ फेब्रुवारीला मतदान तर २ मार्चला मतमोजणी होणार आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने २४५ अधिकारी, कर्मचाऱ्यांची पोटनिवडणुकीच्या कामकाजासाठी नियुक्ती केली आहे. हे अधिकारी, कर्मचारी चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या थेरगावातील 'ग' क्षेत्रीय कार्यालयात हजर राहणार असून ते निवडणुकीचे केंद्र असणार आहे.

**पोटनिवडणूक कार्यक्रम..**

३१ जानेवारी – उमेदवारी अर्ज भरणा प्रक्रिया सुरू
०७ फेब्रुवारी – उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस
०८ फेब्रुवारी – अर्जांची छानन
१० फेब्रुवारी – अर्ज माघारीचा शेवटचा दिवस
२६ फेब्रुवारी – मतदान
०२ मार्च – मतमोजणी.

## संपादकीय »


# यात्रेचे यश टिकवण्याचे आव्हान

***'भारत जोडो यात्रे'ची सांगता सोमवारी (ता. ३०) होत आहे. यात्रेपूर्वी देशात विरोधक जणू अस्तित्वातच नाहीत, अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु या पदयात्रेची संकल्पपूर्ती झाल्यानंतर हे चित्र बदललेले दिसते आहे. आता काँग्रेस पक्षाच्या संघटनेसमोर आव्हान आहे ते या यात्रेत निर्माण झालेला हुरूप टिकवण्याचे.***

अ खेर राहुल गांधींच्या 'भारत जोडो पदयात्रे'ची संकल्पपूर्ती झाली. सात सप्टेंबरला कन्याकुमारीपासून सुरू झालेल्या या ऐतिहासिक पदयात्रेने काश्मीरपर्यंत साडेतीन हजार कि.मी.चा पल्ला पूर्ण केला.तब्बल पाच महिने पायी चालणे गंमत नाही. ही यात्रा करून राहुल गांधी यांनी त्यांच्यावर टीका करणाऱ्यांची तोंडे बंद केली. जम्मू काश्मिरात सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल, अशी शक्यता आधीच व्यक्त करण्यात येत होती. शुक्रवारी झालेही तसेच.जम्मूतील बनिहालमधून सुरू झालेली यात्रा काश्मीर खोऱ्याच्या काझीगुंड भागात प्रवेश करीत असताना लोकांनी सुरक्षा कडे भेदत राहुल गांधींच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी सुरक्षेतील पोलीस गायब झाल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला. राहुल गांधींना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. यात्रा दिल्लीत असतांनाही पोलिसांवर टीकेची झोड उठली होती. दिल्ली आणि जम्मू-काश्मिरात कायदा व सुव्यवस्था केंद्र सरकारकडे आहे. त्यामुळे मोदी सरकारला लक्ष्य करण्याची संधी विरोधकांना आयतीच मिळाली.काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी लगेच गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून सुरक्षेकडे लक्ष देण्याची विनंती करताना संशयही व्यक्त केला आहे. अन्य राज्यांप्रमाणे इथेही 'भारत जोडो'चे स्वागत झाले. २०१६मध्ये भाजपसोबत सरकार स्थापन करणाऱ्या 'जम्मू आणि काश्मीर पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षा'च्या मेहबुबा मुफ्ती, जम्मू काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला यांचा यात्रेतील सहभाग 'बेगानी शादी में अब्दुल्ला दीवाना' इतका ओसंडून वाहणारा होता.

अर्थात या यात्रेने मोदी विरोधकांना मोठ्या प्रमाणात भुरळ घातली. जम्मू काश्मिरातील कलम ३७० रद्द केल्यानंतर या राज्यातील नागरिकांनी प्रथमच भयमुक्त होत राहुल गांधीच्या 'भारत जोडो'त सहभाग घेतला. रस्त्यांच्या दुतर्फा प्रचंड गर्दी केली. सातत्याने अन्याय होत असलेले पंडित राहुल गांधींना भेटले. कलम रद्द करूनही खोऱ्यातील स्थिती 'जैसे थे' असल्याचे सांगत राहुल गांधींत आशेचा किरण शोधू लागले. देशात विरोधक नाहीतच, अशा प्रकारचे चित्र निर्माण झाले होते. यात्रेनंतर ते बदललेले दिसते. देशातील स्वयंसेवी संस्था, कलाकार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते आदी या यात्रेत सहभागी झाले होते.

# भरभराटीचा सुंदर चेहरा





मका काय निर्माण झाला आणि तो कसा सॉल्व्ह करायचा हे एखाद्या लढाऊ योद्ध्याप्रमाणे तुम्हाला जर चॅलेंजिंग वाटून तुम्ही विजयी वीराप्रमाणे आनंदी होऊ इच्छित असाल, वेबसाईट तुम्ही क्रिएटिव्ह बनत छान आणि आकर्षकपणे सजवू शकत असाल, टीमवर्कमध्ये काम करणे तुम्हाला आवडत असेल, नवनवीन गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात तुम्हाला जॉब सॅटिस्फॅक्शन मिळत असेल तर तुमच्यासाठी खोऱ्याने पैसा ओढता येईल असे तंत्रज्ञान क्षेत्र म्हणजे- 'फुल स्टॅक डेव्हलपमेंट'! जगभर अमाप संधी आणि सृजनशीलतेचे आत्मसमाधान देणारे तंत्रज्ञान तुमची याच क्षेत्रात वाट पाहत आहे. कंपन्यांना प्रतिभावान व्यावसायिकांची आणि त्यांच्या प्रॉडक्ट्स व सर्व्हिसेसची माहिती ग्राहकांपर्यंत पोहचविण्याची नितांत आवश्यकता हेच 'फुल स्टॅक डेव्हलपमेंट' क्षेत्राच्या अमाप पैसा देणाऱ्या नोकऱ्यांमागचे खरेखुरे मूळ कारण होय.

अशी झाली सुरुवात!

'फुल स्टॅक डेव्हलपमेंट' हे एक तंत्रज्ञान आहे. याची उत्पत्ती ३ जून २००८ रोजी झाली. बर्न्स अँड मॅकडोनेल टर्मिनल्स आणि पाइपलाइन्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक रँडी श्मिट यांनी जेसन ट्रेम्बले, जेफ्री ग्रोसेनबॅच आणि टॉम प्रेस्टन-वर्नर यांनी केलेल्या कामाचे वर्णन करण्यासाठी 'फुल स्टॅक वेब डेव्हलपर' हा शब्द सर्वप्रथम वापरला होता.१९७० आणि ८० च्या दशकात वेब आणि मोबाईलसाठी डिझाईन हे शब्द नियमितपणे वापरले जात होते. पुढे त्याला डेटाबेसची आणि विविध आर्थिक आदानप्रदान आणि इतर विश्लेषणात्मक गोष्टींची जोड मिळत गेली. कंपनीचा आर्थिक रेव्हेन्यू मिळवण्यासाठी मग एक नवीन गरज भासू लागली आणि त्यातून उदयास आले ते म्हणजे – 'फुल स्टॅक डेव्हलपमेंट.'

काय आहे 'फुल स्टॅक डेव्हलपमेंट'?

स्टॅक म्हणजे गंजी किंवा रास होय. 'फुल स्टॅक डेव्हलपमेंट' हे तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा वापर करणाऱ्या व्यक्तीला 'फुल स्टॅक डेव्हलपर' असे ओळखले जाते. 'फुल स्टॅक डेव्हलपर' हा खऱ्या अर्थाने नफा कमविण्यासाठी कंपनीची प्रतिमा किंवा ब्रांड बिल्ट करण्याचे काम करतात. प्रचंड मागणी, उत्तम वेतन, क्रिएटिव्ह लवचिकता, उत्तम



उत्पादनक्षमता ही 'फुल स्टॅक डेव्हलपमेंट'ची वैशिष्ट्ये आहेत.

'फ्रंट-एंड किंवा क्लाइंट साईड डेव्हलपर' आणि 'बॅक-एंड किंवा सर्व्हर साईड डेव्हलपर' या दोघांचा मिलाफ घडविणारे आणि डेटाबेसचे सखोल ज्ञान असलेले अजब जादूगर म्हणजे 'फुल स्टॅक डेव्हलपर'! 'फुल स्टॅक डेव्हलपर' ही अशी व्यक्ती आहे जी क्लायंट आणि सर्व्हर सॉफ्टवेअर दोन्ही डेव्हलप (विकसित) करू शकते. फ्रंट एंड डेव्हलपर वेबसाईटचे स्वरूप किंवा लेआऊट तयार करण्यात लक्ष केंद्रित करणारी व्यक्ती असते, तर बॅक एंड डेव्हलपर ही व्यक्ती वेबसाईट सर्व्हरशी कसा सुयोग्य, सुरक्षित आणि वेगवान संवाद साधते यावर लक्ष केंद्रित करतो आणि एक फूल स्टॅक विकासक किंवा डेव्हलपर या दोन्ही बाबींच्या संतुलनासाठी काळजी वाहत धोरणात्मक कृती करणारी व्यक्ती असते. या तिन्ही व्यक्तींच्या एकंदरीत कामकाजातून तयार होणारी आणि अष्टौप्रहर काम करणारी प्रणाली किंवा यंत्रणा म्हणजे 'फुल स्टॅक डेव्हलपमेंट.'

किती स्कोप?

आज भारतात ४८ लक्ष कर्मचारी आयटी क्षेत्रात कार्यरत आहेत. गेल्या १० वर्षांपासून इतर व्यवसायांच्या तुलनेत सर्वात वेगवान अशी इनफॉर्मेशन टेक्नोलॉजी (आयटी) क्षेत्रात रोजगारात १२ टक्के वाढ झाली आहे. २०३० पर्यंत ५०० अब्जाहून अधिक गॅझेट्स ऑनलाईन असतील आणि सर्व तंत्रज्ञानामुळे शक्य आहे. तंत्रज्ञानाने आयटी व्यावसायिकांना जन्म दिला आहे. फोर्ब्सच्या मते गेल्या २ वर्षांत इंटरनेट वापरामध्ये ७० टक्के वाढ झाली आहे. 'फुल स्टॅक डेव्हलपमेंट'मध्येही नोकऱ्यांमध्ये जागतिक स्तरावर सर्वाधिक वाढ झाली आहे.

रोजगार संधी आणि आव्हाने


अमेरिकेतील व्हाईट हाऊस असो किंवा भारताचे संसद भवन, जगभरातील जॉब पोर्टलवर फुल स्टॅक डेव्हलपमेंटसाठी २८ हजारांपेक्षा जास्त नोकऱ्या रोज उपलब्ध आहेत. भारतातील फुल स्टॅक डेव्हलपरचा सरासरी पगार ८ लाख प्रतिवर्ष आहे आणि युनायटेड स्टेट्समध्ये प्रतिवर्ष १ लाख १० हजार डॉलर म्हणजे सुमारे ९० लाख रुपये प्रतिवर्ष इतका आहे.

# रिकाम्या हातांची चिंता

**करोना महासाथीमुळे 'ऑनलाइन गेम'च्या लोकप्रियतेत मोठी वाढ झाली. त्यातील काही खेळ हे संधींवर आधारित आहेत. मात्र, बहुसंख्य खेळांत कौशल्य लागते. या कौशल्ययुक्त खेळांत शब्दकोडी, 'ब्रिज', 'रमी', 'पोकर', 'स्क्रॅबल' आणि इतर खेळ समाविष्ट आहेत. हे खेळ खेळताना विचारपूर्वक खेळावे लागतात. तसेच त्यासाठीचे कौशल्यही आवश्यक असते.**

जुगाराकडे कायदा कायमच वक्र दृष्टीने पाहत आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याला 'व्यापारबाह्य उलाढाल' मानले आहे. मात्र, त्याच वेळी न्यायालयांनी वारंवार हेही स्पष्ट केले आहे की, ज्या खेळांत कौशल्य लागते अशा खेळातील आर्थिक उलाढालीस 'जुगार' म्हणून गणले जाणार नाही. जवळपास दीडशे वर्षांपासून संधींचा खेळ अन् कौशल्याचा खेळ वेगळे असल्याचे मानले गेले आहे. १८६७ च्या सार्वजनिक जुगार कायद्याने नि:संदिग्धपणे कौशल्याचे खेळ 'जुगार' श्रेणीतून वगळले आहेत. या कायद्याच्या कलम १२ मध्ये असे नमूद केले आहे की, या कायद्याच्या तरतुदी कुठेही निव्वळ कौशल्य पणाला लावून खेळल्या जाणाऱ्या खेळाला लागू होणार नाहीत.

अनेक जुने कायदे रद्द करण्यात आले असले तरी १८६७ चा हा कायदा अजूनही लागू आहे. त्यामुळे



संसदेने खेळांच्या दोन श्रेणींमधील फरक कायम ठेवला असून, कुठेही निव्वळ कौशल्य वापरून खेळल्या जाणाऱ्या खेळांना 'जुगार' मानले जाणार नाही ही तरतूद कायम आहे. अलीकडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने 'ऑनलाइन गेम'चे नियमन करण्यासाठी अधिसूचनेचा मसुदा तयार केला आहे. कौशल्याच्या 'ऑनलाइन' खेळांचे नियमन करण्यास कोणतीही हरकत नाही. मात्र, या नियम किंवा अधिसूचनेत कौशल्याच्या खेळांना जुगार मानण्याची तरतूद असेल, तर त्याला मान्य करता येणार नाही. कारण ही तरतूद सार्वजनिक जुगार कायद्याशी (१८६७) विसंगत असेल.

'अश्वशर्यती' हा जुगार आहे अथवा नाही, याबाबत एकदा गंभीर वाद निर्माण झाला. यावर सविस्तर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने या शर्यती हा कौशल्याचा खेळ असून, त्याला जुगार मानता येणार नाही असे स्पष्ट केले होते. ज्या खेळांमध्ये एखादा जिंकतो अशा सरसकट सर्वच खेळांना अपायकारक कृती मानून त्यांच्यावर शक्य तेवढ्या अधिक कठोर कर आकारणी करण्याचे प्रयत्न वारंवार सुरू आहेत. याविषयी नेमल्या गेलेल्या मंत्रिगटातही अगदी अशीच नैतिक द्विधावस्था निर्माण झाल्याचे दिसले आहे. 'ऑनलाइन गेम'च्या संपूर्ण उत्पन्नावर सर्वाधिक २८ टक्के कर आकारणी करावी, की संबंधित 'गेम' घेणारी कंपनी या खेळासाठी आकारत असलेल्या शुल्कापोटी उत्पन्नावर ही कर आकारणी करावी, याविषयी तो मंत्रिगट एकच स्पष्ट भूमिका घेऊ शकलेला नाही.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# संसदेत महाराष्ट्राचा आवाज बुलंद करा!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खासदारांना आवाहन

।मुंबई । महाईन्यूज ।

**संसद सदस्य हे राज्याच्या विकासासाठी झटणारे आणि त्यासाठी देशाच्या सर्वोच्च सभागृहातील महाराष्ट्राचा आवाज आहेत. हा आवाज जितका बुलंद तेवढ्या विकासाच्या योजना, निधी राज्यात येणार आहेत. त्यासाठी आपण सर्व एकत्र येऊन केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांबाबत पाठपुरावा करावा. त्यासाठी महाराष्ट्र सदनातील निवासी आयुक्तांनी केंद्रीय मंत्रालय आणि राज्यातील विविध विभाग यातील दुवा म्हणून काम करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी येथे केले.**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संसद सदस्यांची बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नारायण राणे, केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, कपिल पाटील, डॉ. भारती पवार आदी उपस्थित होते. या बैठकीकडे उद्धव ठाकरे गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे डॉ. अमोल कोल्हे वगळता बहुतांश खासदारांनी पाठ फिरवली होती. यावेळी बोलताना शिंदे म्हणाले, राज्याच्या हिताचे, सर्व सामान्यांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारे प्रस्ताव केंद्र शासनाकडे असून त्यांना गती देण्यासाठी आपण एकदिलाने काम



करू. त्यासाठी ही बैठक महत्वाची आहे. प्रलंबित प्रस्ताव, प्रश्नांबाबत पाठपुरावा करतानाच, राज्याच्या विकासासाठी आणखी नवे, अभिनव प्रकल्प, उपक्रम, योजना यांची मांडणी व्हावी अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. आजच्या बैठकीत खासदारांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्यांवर झालेल्या कार्यवाहीबाबत पाठपुरावा करण्यासाठी दोन महिन्यांनी पुन्हा एक बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन शिंदे यांनी दिले.

केंद्र शासनाकडून राज्याला आवश्यक तो निधी वेळेवर मिळावा यासाठी आवश्यक ती उपयोगिता प्रमाणपत्र मुदतीत पाठविण्यात यावीत. मंत्रालयीन विविध विभागांच्या सचिवांनी यात लक्ष घालावे आणि भविष्यात वेळीच उपयोगिता प्रमाणपत्र सादर केली जातील, याची काळजी घ्यावी, असे निर्देश शिंदे यांनी यावेळी दिले.

### रेल्वे प्रकल्पासाठी 50 टक्के निधी देणार

**संसदेमध्ये विविध आयुधांचा वापर करून खासदारांनी राज्याचे प्रलंबित प्रस्ताव आणि प्रश्न मांडावेत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. रेल्वे प्रकल्पांसाठी राज्य शासनाचा ५० टक्के वाटा न देण्याचा निर्णय आम्ही रद्द केला असून आता रेल्वे प्रकल्पांसाठी ५० टक्के निधी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी जाहीर केले.**

केंद्र शासनाकडून महाराष्ट्राला भरीव निधी मिळत असून नुकतेच राज्याच्या नगरविकास विभागाच्या १५ हजार कोटींच्या प्रस्तावाला पंतप्रधानांनी मंजुरी दिल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

विभागांनी खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र वेळेवर द्यावे. त्यामुळे केंद्र सरकारकडे असलेला निधी मिळण्यास मदत होईल. सध्या केंद्राकडून १ हजार ४०० कोटी रुपये मिळाले असून सर्वांनी वेळेत उपयोगिता प्रमाणपत्र द्यावे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी खासदार गजानन कीर्तिकार, इम्तियाज जलील, धनंजय महाडिक, रामदास तडस, धैर्यशील माने, राजेंद्र गावित, डॉ. श्रीकांत शिंदे, हेमंत पाटील, श्रीरंग बारणे, पूनम महाजन, डॉ. प्रीतम मुंडे, नवनीत राणा, मनोज कोटक, संजय मंडलिक, प्रताप जाधव, डॉ. सुजय विखे -पाटील, रणजितसिंह नाईक-निंबाळकर, सुधाकर श्रृंगारे, गोपाळ शेट्टी, हेमंत गोडसे, डॉ. अमोल कोल्हे उपस्थित होते.

# भिवंडी महानगरपालिका अधिकारी कर्मचारी महासंघाचे उपोषण!

## सरकारच्या आकृतीबंधामध्ये अन्याय झाल्याचा आरोप

।भिवंडी । महाईन्यूज ।

**भिवंडी महानगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांवर सेवा प्रवेश नियमावली (आकृतीबंध) मध्ये अन्याय केला आहे. तसेच 2005 नंतर कामावर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांची फसवणूक करुन त्यांचे भविष्य अंधारात लोटले आहे.**



हे दोन्ही विषय अतिशय गंभीर असून कर्मचाऱ्यांचे आयुष्य उध्वस्त करणारे आहे. या प्रकरणी नवीन आकृतिबंधात त्रुटी दूर करून त्यामध्ये तात्काळ सुधारणा करावी तसेच कर्मचाऱ्यांवर अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी लेखी मागणी पालिका आयुक्तांकडे करीत भिवंडी मनपा कामगार कर्मचारी संघर्ष कृती समितीचे पदाधिकारी आणि अधिकारी-कर्मचारी यांनी सोमवार 30 जानेवारी 2023 रोजी पालिका मुख्यालयाच्या गेट जवळ इशारा उपोषण पुकारले आहे. या कृती समितीमध्ये म्युनिसिपल मजदूर युनियन, अखिल महाराष्ट्र ज.का. युनियन, म.रा.कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, भारतीय कामगार कर्मचारी महासंघ, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड, शासकीय वाहन चालक, भिवंडी विभाग या युनियनचा सहभाग आहे.

तब्बल 12 वर्षाच्या प्रतिक्षेनंतर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रवेश नियमावलीला (आकृतीबंध) नुकतीच शासनाने मंजुरी दिलेली आहे. वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न यामुळे मिटणार होता. मात्र, इतक्या प्रतिक्षेनंतरही काही निवडक, स्वार्थी पालिका अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे चुकीच्या पध्दतीने आपले सहकारी आणि आर्थिक देवाणघेवाण केलेल्यांचे हित जोपासत सेवा प्रवेश नियमावली, आकृतीबंध शासनाकडून मंजूर करुन आणले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत स्थानिक कर्मचाऱ्यांना (लिपिक, आरोग्य निरीक्षक वगैरे) डावलून त्यांना पदोन्नतीसाठी वंचित ठेऊन सरळसेवेने भरती करण्याचा कुटिल डाव काही अधिकाऱ्यांनी आखला आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाचा ताळमेळ न बसविता वर्ग 1, वर्ग 2 ची पदे ज्याचे दरमहा वेतन लाखाच्या घरात आहेत अशा पदांना मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सफाई कामगार, रोड कामगार, मुकादम, ड्रायव्हर यांचा विचार न करता खाजगीकरणाच्या दिशेने पाऊल उचलले असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे या सेवा प्रवेश नियमावलीला (आकृतीबंध) स्थगिती देऊन भिवंडी मनपात असलेल्या विविध विभागानुसारच सेवा प्रवेश नियमावली, आकृतीबंध तयार करण्यात यावे अशी मागणी भिवंडी मनपा कामगार कर्मचारी संघर्ष कृती समितीची आहे. सध्या काम करीत असलेल्या सफाई कामगार, रोड कामगार, मुकादम, ड्रायव्हर यांचा विचारच करण्यात आलेला नाही. शहराच्या लोकसंख्येच्या मानाने सफाई कामगारांची संख्या अगदीच तुटपुंजी आहे.

# रिकामटेकड्या संजय राऊतांची दिवाळखोरी

।डोंबिवली - ।महाईन्यूज ।

बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर टीकास्त्र सोडलंय. संजय राऊत रिकामटेकडे असून त्यांच्याकडे कोणतेही काम नाही, अशी टीका संजय गायकवाड यांनी केली आहे. मुंबईत रविवारी निघालेल्या मोर्चावर संजय राऊत यांनी टीकास्त्र सोडलं होतं. त्यावरुन संजय गायकवाड यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला.

**धनुष्यबाण हे चिन्ह बाळासाहेबांच्या शिवसेनेलाच मिळेल -**

ऑन मेरिट खासदार आणि आमदारांची संख्या लक्षात घेता, निवडणूक आयोग धनुष्यबाण हे चिन्ह बाळासाहेबांच्या शिवसेनेलाच देईल. कारण निवडणूक आयोगाने या वादावर तोडगा काढण्यासाठी बाळासाहेबांची शिवसेना हे एक नाव, प्रबोधनकार ठाकरेंची शिवसेना हे दुसरं नाव आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे हे तिसरं नाव अशा तीन नावांपैकी ठाकरे गटाला सांगितलं की, तुम्हाला कुठलं नाव चालतं...? त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना घेतलं नाही. त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना हे नाव घेतलं, आणि धनुष्यबाण हे जे चिन्ह घेतलं होतं ते बाळासाहेबांनी घेतलं होतं. ती बाळासाहेबांची शिवसेना आम्हाला भेटल्यामुळे त्यांना त्या चिन्हावर हक्क सांगायचा अधिकार नाही.

### रिकामटेकड्या संजय राऊतांची दिवाळखोरी

**संजय राऊत हा एक रिकामटेकडा माणूस आहे. त्याच्याकडे कुठलेही काम नाहीये. मराठा समाजाच्या निघालेल्या लाखोंच्या मोर्चाला सुद्धा त्याने मुक्काम मोर्चा म्हणून टिंगल केली होती. सध्या राज्यात आणि देशांमध्ये जे हिंदू जन आक्रोश मोर्चे निघत आहेत, ते गोमातेच्या रक्षणासाठी आहेत. आतंकवाद्यांच्या सांगण्यावरून आपल्या देशामध्ये लव्ह जिहाद हैदोस घालतो आहे, लाखो मुलींचे धर्मांतर त्या ठिकाणी केले जातेय. त्याच्या विरोधात धर्मांतर बंदी कायदा आणण्यासाठी हे मोर्चे निघत आहेत. अनेक राज्यांनी हा कायदा लागू केला आहे. संपूर्ण देशात हा कायदा लागू करण्यात यावा. हा कायदा आपल्या हिताचा आहे. अशा मोर्चांवर टिंगल टवाळी करणं म्हणजे त्या हिंदुत्ववादी पक्षामध्ये काम करणाऱ्या संजय राऊतांची दिवाळखोरी निघाल्याचे दिसत आहे, असे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड म्हणाले.**

# फोडा आणि राज्य करा, हेच काँग्रेसचे धोरण!

## भाजपचा काँग्रेस नेतृत्वावर हल्लाबोल

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**फोडा आणि राज्य करा, हेच धोरण दशकानुदशके राबविणाऱ्या काँग्रेसने व त्यांचे नेते राहूल गांधी यांनी 'भारत जोडो'बद्दल बोलणे हे फारच उपरोधिक आहे असे सांगतानाच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑगस्ट २०१९ मध्ये काश्मीरला भारताचा अविभाज्य भाग बनवले, त्यामुळेच तुम्ही आज श्रीनगरमध्ये तिरंगा फडकावू शकलात अशा शब्दांत भाजपने काँग्रेस नेतृत्वावर हल्लाबोल केला.**

अंगण आणि गल्ल्या, मंदिरे आणि गुरुद्वारे, खेडी आणि शेते यांच्यात तसेच जातीपातींमध्ये फूट पाडणे व सातत्याने सत्ता मिळविणे हे काँग्रेसचे एकमेव धोरण राहिले आहे. आणि एका मतासाठी तुम्ही देशाचा पाया खिळखिळा केला हा तुमचा इतिहास आहे असे सांगून भाजप नेते सुधांशू त्रिवेदी म्हणाले की राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची भारत जोडो यात्रा राजकीय हेतूने प्रेरित होती. राहूल यांचे नेतृत्व प्रस्थापित करण्याचा तो आणखी एक प्रयत्न होता. मात्र ही यात्रा आपल्या उद्देशात अयशस्वी ठरल्याचे दिसून येत आहे. हे यात्रेकरू ना गांधींच्या राज्यात गेले ना नेहरूंच्या राज्यात. दक्षिण भारतातील केरळपासून सुरुवात करून, सर्व प्रकारच्या खटाटोपांतून पुढे जात काँग्रेस आणि राहुल गांधींचा तथाकथित भारत जोडो प्रवास संपुष्टात आला आहे.

ते म्हणाले की मुळात कॉंग्रेस व गांधी यांनी भाजपच्या द्वेषातून ही यात्रा काढली. ते म्हणतात की यात्रेदरम्यान कुठेही द्वेष दिसला नाही. देशाच्या विभाजनाला जबाबदार असलेला हा पक्ष भारत जोडोची चर्चा करते यापेक्षा मोठी विडंबना असूच शकत नाही. तामिळनाडूत अभिनेते व अयशस्वी राजकारणी कमल हसन, पुढे चालून, 'गांधीयन्स विथ गन्स' अशी टीका करणाऱ्या मेधा पाटकरांना यांनी बरोबर घेतले. यात्रा दिल्लीला पोहोचली की म्हणाले सारे या. मग काश्मीरमध्ये यात्रा जाताच दिग्विजयसिंह सर्जिकल स्ट्राईकबद्दल संशय घेणारे वक्तव्य करतात आणि मग त्यांच्यासमोरून माईक काढून टाकला जातो. हे सारे प्रकार देशवासीयांनी पाहिलेले आहेत असे त्रिवेदी म्हणाले.भारत जोडो यात्रेचे नियोजन करताना भारत तोडो कधी झाले याची आठवण करून दिली पाहिजे असे सांगून त्रिवेदी म्हणाले की जेव्हा भारतमातेचे दोन तुकडे झाले होते. आज जर राहुल गांधी काश्मीरमध्ये ध्वज फडकवत असतील तर ते केवळ आमच्या संयोजकांनी आपल्या प्राणांची आहुती दिल्याने आणि पंतप्रधानांनी कलम ३७० रद्द केल्यानेच, असेही त्रिवेदी यांनी सांगितले.

### राहूल यांचे नेतृत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न

**अंगण आणि गल्ल्या, मंदिरे आणि गुरुद्वारे, खेडी आणि शेते यांच्यात तसेच जातीपातींमध्ये फूट पाडणे व सातत्याने सत्ता मिळविणे हे काँग्रेसचे एकमेव धोरण राहिले आहे. आणि एका मतासाठी तुम्ही देशाचा पाया खिळखिळा केला हा तुमचा इतिहास आहे असे सांगून भाजप नेते सुधांशू त्रिवेदी म्हणाले की राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची भारत जोडो यात्रा राजकीय हेतूने प्रेरित होती. राहूल यांचे नेतृत्व प्रस्थापित करण्याचा तो आणखी एक प्रयत्न होता. मात्र ही यात्रा आपल्या उद्देशात अयशस्वी ठरल्याचे दिसून येत आहे.**

# मी मरेन पण भाजपसोबत जाणार नाही...

## नितीश कुमार यांचा घणाघात

।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।



भाजपमध्ये येण्याच्या प्रश्नावर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मी मरेन, पण भाजपसोबत जाणार नाही, असे वक्तव्य केले. माझ्यासोबत सरकारमध्ये असताना लालू यादव आणि तेजस्वी यांना गोवण्याचे काम भाजपने केले आहे आहे, असेही मुख्यमंत्री पुढे बोलताना म्हणाले. आता तेजस्वी आमच्यासोबत आहे, त्यांना दूर करण्यासाठी भाजप पुन्हा त्यांना अडचणीत आणत आहे. भाजप पक्ष आता जुना भाजप राहिला नाही. भाजप आता नवीन पक्ष आहे. जुन्या नेत्यांना विचारला भाजप झाला आहे. जुन्या नेत्यांना विचाराल तर तेही तेच सांगतील.भाजप नेते आणि बिहार विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या या वक्तव्याला प्रत्युत्तर दिले आहे. यापूर्वी देखील नितीश यांनी आपण मातीत मिसळून जाल, पण भाजपसोबत जाणार नाही, असे म्हटले होते. मग पुन्हा भाजपसोबत युती का केली होती, अशी टीका त्यांनी केली.

भाजपने तुम्हाला बापाप्रमाणे प्रेम दिले. बापाप्रमाणे तुम्हाला मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले. ज्याच्या आधारे तुम्ही सद्या खुर्चीवर बसला आहात. तुमच्यासोबत जे आहेत, त्यांना देखील भाजपनेच मोठे केले आहे. 2024 मध्ये तुम्हाला किती जागा मिळतील हे सर्वांना माहीत आहे. तुम्हाला एकही जागा मिळणार नाही. असाही घणाघात नितीश कुमारांवर केला आहे. राष्ट्रपिता यांना आदरांजली वाहण्यासाठी मुख्यमंत्री नितीश कुमार आणि राज्यपाल फागू चौहान पाटण्यातील गांधी घाटावर पोहोचले होते. दरम्यान, प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, बापू सर्वांना वाचविण्यासाठी संघर्ष करत होते. सर्वांना सोबत घेऊन जात असे, त्यामुळेच त्यांची हत्या करण्यात आली. हे कोणालाच विसरायचे नाही, या लोकांना कितीही विसरायचे असले, कितीही भांडायला लावायचे असले तरी ते विसरता येणार नाही. आमच्यासाठी मरणे मान्य आहे, परंतू भाजपसोबत जाणे त्यांना मान्य नाही.

# नमाज सुरु असताना मशिदीत बॉम्बस्फोट

## 28 जणांचा मृत्यू, 150 जखमी, मृताची संख्या वाढण्याची भीती

। पेशावर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पाकिस्तानमधील पेशावरमध्ये मशिदीत बॉम्बस्फोट झालाय. येथील पोलीस वसाहतीमधील मशिदीमध्ये भाविक नमाज पठण करत होते, त्यावेळी अचानक बॉम्बस्फोट झाला.**



पाकिस्तानमधील पेशावरमध्ये मशिदीत बॉम्बस्फोट झालाय. येथील पोलीस वसाहतीमधील मशिदीमध्ये भाविक नमाज पठण करत होते, त्यावेळी अचानक बॉम्बस्फोट झाल्याचं वृत्त आहे. या बॉम्बस्फोटात 28 जणांचा मृत्यू झाला आहे तर 150 जण जखमी आहेत. जखमींना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळावर पोलीस आणि तपास यंत्रणा पोहचल्या असून तपास सुरु आहे. या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेनं घेतलेली नाही. पण या बॉम्बस्फोटात मोठं नुकसान झाल्याचं वृत्त आहे. स्थानिक मीडिया रिपोर्ट्सनुसार, बॉम्बस्फोट (BOMB BLAST) झाल्यानंतर मशिदीचं छत कोसळलं आहे. नमाज सुरु असताना हल्लेखोरानं बॉम्बनं स्वत:ला उडवलं. या हल्ल्यातील मृताची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.

### मृताची संख्या आणखी वाढण्याची शक्यता

**या बॉम्बस्फोटात 28 जणांचा मृत्यू झाला आहे तर 150 जण जखमी आहेत. जखमींना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळावर पोलीस आणि तपास यंत्रणा पोहचल्या असून तपास सुरु आहे. या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेनं घेतलेली नाही. पण या बॉम्बस्फोटात मोठं नुकसान झाल्याचं वृत्त आहे. स्थानिक मीडिया रिपोर्ट्सनुसार, बॉम्बस्फोट (BOMB BLAST) झाल्यानंतर मशिदीचं छत कोसळलं आहे. नमाज सुरु असताना हल्लेखोरानं बॉम्बनं स्वत:ला उडवलं. या हल्ल्यातील मृताची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.**

डॉनच्या वृत्तानुसार, बॉम्बस्फोटामुळे मशिदीचा बराचसा भाग कोसळला आहे. त्यामुळे ढिगाऱ्याखाली अनेक भाविक अडकले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या स्फोटानंतर पोलीस आणि स्थानिक प्रशासनाचं पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. मशिदीमध्ये सध्या बचावकार्य सुरू आहे. त्याशिवाय जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, मृतामध्ये दोन पोलीस कर्मचाऱ्याचाही समावेश आहे.

रॉयटर्सनं दिलेल्या वृत्तानसुरा, आज दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास मशिदीत नमाज पठण सुरु असताना एका हल्लेखोरानं स्वत:ला बॉम्बने उडवून घेतले. यामध्ये 28 जणांचा मृत्यू झालाय. तर 150 पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. ढिगाऱ्याखाली अनेक लोक अडकले आहेत.

# 'कुंडली भाग्य' फेम श्रद्धाचा टॉवेल डान्स व्हायरल!

हिंदी टीव्ही मनोरंजन विश्वातील 'कुंडली भाग्य' ही एक लोकप्रिय मालिका आहे. यामालिकेतील प्रिताची भुमिका प्रेक्षकांना खुप आवडते. टीव्हीवर सुसंस्कृत सुनेची भुमिका करणारी श्रद्धा आर्या ही तिच्या खऱ्या आयुष्यात खूपच बोल्ड आहे. श्रद्धा सोशल मिडियावर सक्रिय आहे. ती नेहमीच तिचे ग्लॅमरस फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडियावर शेअर करत असते. तिचा चाहता वर्गही चांगला आहे.

नुकतचं श्रद्धाने तिच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, जो पाहून तिच्या चाहत्यांनाही धक्का बसला आहे. या व्हिडिओमध्ये ती टॉवेल घालून नाचताना दिसत आहे. श्रद्धाचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून नेटकरी या व्हिडिओला प्रतिक्रिया देत आहेत.

श्रद्धाचा व्हायरल होत असलेला व्हिडिओ तिने स्वतः त्याच्या इंस्टाग्राम हँडलवर शेअर केला आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये श्रद्धा तिच्या रुममध्ये ऑफिसला जाण्यासाठी तयार होताना दिसत आहे. यात तिने टॉवेल डान्स करत ती तयारी करत आहेत. मात्र, तयारीसोबतच ती मस्तीच्याही मूडमध्ये आहे. तयार होण्यापासून ते क्रीम लावण्यापर्यंतची सगळी काम तिने या व्हिडिओत दाखवली आहे.



# अभिनेत्री आता होणार निर्माती.. शर्मिष्ठा राऊतने सुरु केलं स्वत:चं प्रॉडक्शन हाऊस

मराठी मनोरंजन सृष्टीतली एक हरहुन्नरी अभिनेत्री म्हणजे शर्मिष्ठा राऊत. शर्मिष्ठा राऊत मराठी मनोरंजन क्षेत्रात गेली अनेक वर्ष कार्यरत आहे. सध्या शर्मिष्ठा अबोली मालिकेत झळकत आहे. गेली अनेक वर्ष अभिनेत्री असलेली शर्मिष्ठा राऊत आता निर्माती होणार आहे. शर्मिष्ठाने स्वतःच्या प्रॉडक्शन हाऊसची घोषणा केली आहे. त्यामुळे आता शर्मिष्ठा राऊत निर्माती होणार आहे.

अभिनेत्री म्हणून शर्मिष्ठाची ओळख आणि चर्चा सगळीकडे असते. शर्मिष्ठाने आता निर्मिती संस्थेची घोषणा केल्याने ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. शर्मिष्ठाच्या प्रॉडक्शन हाऊसचं नाव अजून ठरलं नाहीये. पण या प्रॉडक्शन हाऊसच्या माध्यमातून शर्मिष्ठा दर्जेदार मराठी मालिकांची निर्मिती करणार आहे. शर्मिष्ठाचा नवरा तेजस देसाई सुद्धा बायकोच्या या प्रॉडक्शन हाऊससाठी तिला खंबीर साथ देणार आहे.



शर्मिष्ठा राऊतला आपण जुळून येति रेशीमगाठी, सुखांच्या सरींनी हे मन बावरे, उंच माझा झोका अशा मालिकांमध्ये पाहिलंय. शर्मिष्ठा बिग बॉस मराठी २ मध्ये सुद्धा सहभागी होती. शर्मिष्ठाने तेजस देसाई सोबत अरेंज मॅरेज केलं. शर्मिष्ठा आणि तेजसची लव्हस्टोरी फार इंटरेस्टिंग आहे. शर्मिष्ठा लोकप्रियता अभिनेत्री असूनही तिचं स्थळ आल्यावर तेजसला शर्मिष्ठा राऊत कोण हे माहित नव्हतं.

त्यानं तिचं कामही पाहिलं नव्हतं, पण पहिल्याच भेटीत तेजस शर्मिष्ठाच्या प्रेमात पडला आणि तसं त्यानं तिला सांगितलंही. पण त्यावेळी शर्मिष्ठानं विचार करण्यासाठी काही दिवसांचा वेळ मागितला. कालांतरानं तिलाही तेजस आवडू लागला. या व्यक्तीबरोबर आपलं संपूर्ण आयुष्य आपण सुखात घालवू शकतो, हे जाणवल्यानंतर शर्मिष्ठानं तेजसला होकार दिला.

# कंगनाने 'चंद्रमुखी 2' च्या क्लायमॅक्स गाण्यासाठी रिहर्सल केली सुरु



अभिनेत्री कंगना रणौतने एक अपडेट शेअर केला आहे ज्यामध्ये तिने म्हटले आहे की चंद्रमुखी 2 चित्रपटाच्या क्लायमॅक्स गाण्यासाठी रिहर्सल सुरू झाली आहे. राघव लॉरेन्स या चित्रपटात मुख्य अभिनेता आहे. कंगनाने तिच्या ट्विटर हँडलवर चित्रपटाविषयी अपडेट दिले आहे.

तिने उल्लेख केला, 'कला मास्टरजींसोबत चंद्रमुखी 2 च्या क्लायमॅक्स गाण्याची रिहर्सल सुरू केली. हे गाणे गोल्डन ग्लोब विजेते श्री एम एम कीरावानी जी यांनी संगीतबद्ध केले आहे. महान श्री पी. वासू जी यांनी दिग्दर्शित केले'.

चंद्रमुखी 2 चे दिग्दर्शन पी. वासू यांनी केले आहे. 2005 मध्ये सुपरस्टार रजनीकांत आणि ज्योतिका सरवणन यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचा प्रीक्वेल रिलीज झाला होता. चंद्रमुखी हा मल्याळम चित्रपट मणिचित्रथाझूचा रीमेक आहे आणि अक्षय कुमार-स्टारर भूल भुलैया म्हणून हिंदीमध्ये रूपांतरित झाला.

# फ्लॉप सिनेमांमुळे वैतागला होता शाहरुख.. बॉलीवूड सोडून करणार होता हा व्यवसाय

जगभरात पठाणचा धुमाकूळ सुरू आहे. पाचशे करोडचा टप्पा ओलांडत किंग खानच्या पठाणनं आता १००० कोटी करण्याकडे आपली घोडदौड सुरू केली आहे. तब्बल ४ वर्षांनी मोठ्या पडद्यावर झळकलेल्या शाहरुखनं वयाच्या ५७ व्या वर्षातही चाहत्यांना वेड करायची ताकद आजही आपल्यात आहे हे दाखवून दिलंय. पुन्हा एकदा बॉलीवूडमध्ये बादशहा एकच हे सिद्ध झालं आहे.

आज पठाणचं यश आपल्या चाहत्यांसोबत शेअर करण्यासाठी..त्यांचे मनापासून आभार व्यक्त करण्यासाठी शाहरुख खाननं एक पत्रकार परिषद घेतली होती. शाहरुखसोत जॉन अब्राहम आणि दीपिका पदूकोण सोबत पठाणची संपूर्ण टीम हजर होती. यावेळी शाहरुखनं आपण बॉलीवूड सोडणार होतो...असा धक्कादायक खुलासा केल्यानं सगळेच हैराण झाले आहेत. नेमकं काय म्हणालाय किंग खान



याविषयी..चला जाणून घेऊया.

शाहरुख खानने पठाण निमित्त पत्रकार परिषद घेतली आहे. यावेळी शाहरुख खान मनातलं बोलला. शाहरुख म्हणाला,"माझा याआधीचा सिनेमा फ्लॉप झालेला. गेली ४ वर्ष खूप वेगळ्या अवस्थेत गेलेली. मी वैतागलो होतो. एकावेळी मी इंडस्ट्री सोडण्याचा विचार करतो. मी या काळात जेवण बनवायला शिकलो. मी फूड बिझनेस करण्याच्या विचारात होतो. त्याचं नाव ठेवणार होतो

# अंडर-19 वर्ल्डकप जिंकताच महिला खेळाडूंचा दबदबा!




## हरमनप्रीत कौर आघाडीच्या स्पोर्ट्स ब्रँडची होणार ब्रँड अॅम्बेसेडर

**।नवी दिल्ली।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**भारताची स्टार फलंदाज आणि कर्णधार हरमनप्रीत कौरने एका आघाडीच्या स्पोर्ट्स ब्रँडशी ब्रँड अॅम्बेसेडर म्हणून हातमिळवणी केली आहे.**

पंजाबच्या ३३ वर्षीय तेजस्वी फलंदाजाने जगातील चौथ्या जलद महिला टी२० शतकाचा विक्रम केला आहे आणि महिलांच्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ती भारताची एकमेव शतकवीर आहे. हरमनप्रीतने आपल्या कारकिर्दीत आतापर्यंत सहा आंतरराष्ट्रीय शतके झळकावली आहेत, त्यापैकी पाच वनडेमध्ये आहेत. २०१७ मध्ये टी२० आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा केलेल्या खेळाडूला अर्जुन पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे.

अभिषेक गांगुली, व्यवस्थापकीय संचालक, प्यूमा इंडिया आणि दक्षिण पूर्व आशिया, एका अधिकृत निवेदनात म्हणाले, "ती ज्या धाडसी आणि धडाकेबाज पद्धतीने क्रिकेट खेळते, ती आमच्या ब्रँडसाठी योग्य आहे. एक ब्रँड म्हणून, PUMA नेहमी आपल्या वेळेच्या पुढे आहे आणि खेळांमध्ये महिलांना पाठिंबा देण्यासाठी, उत्सव साजरा करण्यासाठी आणि सक्षमीकरण करण्यासाठी वचनबद्ध आहे. हा करार त्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. या करारामुळे, हरमनप्रीत प्यूमाच्या विराट कोहली, केएल राहुल, करीना कपूर खान, युवराज सिंग, सुनील छेत्री अलीकडे हार्दी संधू आणि अनुष्का शर्मा यांसारख्या मोठ्या व्यक्तींच्या यादीत सामील झाली आहे.

सर्व फॉरमॅटमध्ये ही फलंदाज भारताचा सर्वात विश्वासार्ह फलंदाज आहे आणि ती भारतीय महिला संघाच्या फळीचा कणा आहे. त्याने १२४ एकदिवसीय सामन्यांमध्ये ३८.१८च्या सरासरीने पाच शतके आणि १७ अर्धशतकांसह ३,३२२ धावा केल्या आहेत. ११४ टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यामध्ये, तिने २८.०२ च्या सरासरीने २,८८७ धावा केल्या आहेत ज्यात एक शतक आणि नऊ अर्धशतकांचा समावेश आहे. शफाली वर्माने जसा इतिहास रचत अंडर-१९चा वर्ल्डकप जिंकला. तशीच कामगिरी करण्यासाठी हरमनब्रिगेड दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या टी२० वर्ल्डकपसाठी सज्ज झाली आहे.

### स्पोर्ट्स ब्रँड नेहरमनप्रीत कौरची नियुक्ती

**» महिलांचे चौथे सर्वात जलद टी२० आंतरराष्ट्रीय शतक झळकावणारी हरमनप्रीत म्हणाली, "मी २०१३ मध्ये माझे पहिले एकदिवसीय शतक PUMAचे बूट घालून झळकावले होते हे अनेकांना माहीत नाही, ज्याला माझ्या सुरुवातीच्या काळात ब्रँडने मान्यता दिली होती. आता अगदी एका दशकानंतर प्युमाचा चेहरा म्हणून माझी निवड झाली आहे. PUMA सारखा ब्रँड भारतीय महिला क्रिकेटच्या वाढीला पाठिंबा देत असल्याचे पाहून आनंद होतो. प्रगती एकत्रित करणे महत्वाचे आहे. ही फक्त सुरुवात आहे आणि मला खात्री आहे की ही संघटना क्रिकेटमध्ये करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक महिलांना प्रोत्साहन देईल.**

# हॉकी फेडरेशनचे मोठे पाऊल!

## » प्रशिक्षक ग्रॅहम रीड यांचा राजीनामा, विश्वचषकातील पराभव जिव्हारी

**।ऑस्ट्रेलिया।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारतीय हॉकी संघाचे प्रशिक्षक ग्रॅहम रीड यांनी राजीनामा दिला आहे. ओडिशामध्ये नुकत्याच झालेल्या हॉकी वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाच्या खराब कामगिरीनंतर रीडने आपल्या पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याशिवाय विश्लेषणात्मक प्रशिक्षक ग्रेग क्लार्क आणि वैज्ञानिक सल्लागार मिचेल डेव्हिड पेम्बर्टन यांनीही राजीनामा दिला आहे. हॉकी विश्वचषकात भारतीय संघ नवव्या स्थानावर राहिला.

रीड यांची एप्रिल २०१९ मध्ये भारताच्या प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्याच्या देखरेखीखाली भारताने २०२१ च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक कांस्यपदक जिंकले. ५८ वर्षीय ऑस्ट्रेलियन रीड यांनी भुवनेश्वरमध्ये विश्वचषक संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप टिर्की यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. विश्वचषकाच्या अंतिम फेरीत जर्मनीने बेल्जियमचा पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव केला आणि संघ चॅम्पियन बनला. जर्मनीचे हे तिसरे विश्वचषक विजेतेपद ठरले.

राजीनामा जाहीर करताना रीड म्हणाले, "आता माझ्या पदावरून पायउतार होण्याची आणि पुढील व्यवस्थापनाकडे जबाबदारी सोपवण्याची वेळ आली आहे. संघ आणि हॉकी इंडियासोबत काम करणे हा सन्मान आणि विशेषाधिकार आहे. या अद्भुत प्रवासातील प्रत्येक क्षणाचा मी आनंद लुटला आहे. मी संघाला भविष्यासाठी शुभेच्छा देतो."

गट टप्प्यात संघाने स्पेनचा २-० असा पराभव केला, त्यानंतर इंग्लंडसोबत ०-० अशी बरोबरी साधली आणि शेवटच्या गट सामन्यात वेल्सचा ४-२ असा पराभव केला. यानंतर क्वार्टर फायनलमध्ये पोहोचण्यासाठी भारताला क्रॉसओव्हर मॅचमध्ये न्यूझीलंडवर मात करावी लागली, पण आघाडी घेतल्यानंतर भारतीय संघाला तो सामना जिंकता आला नाही. न्यूझीलंडने पूर्ण वेळेत स्कोअर ३-३ वर आणला. त्यानंतर भारतीय संघ पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभूत झाला आणि उपांत्यपूर्व फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला. मात्र, क्लासिफिकेशन राउंडमध्ये भारतीय संघाची कामगिरी जबरदस्त होती.



### विश्वचषकात अनेक यश, पण अपयश

**» राजीनामा दिल्यानंतर हे तिघेही पुढील महिनाभर नोटीस पिरियडमध्ये राहतील. ऑस्ट्रेलियासाठी हॉकी खेळणाऱ्या रीड आणि त्याच्या टीमसोबत भारताने ४१ वर्षांनंतर ऑलिम्पिक कांस्यपदक जिंकले. याशिवाय, भारतीय संघाने बर्मिंगहॅम राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्य आणि FIH प्रो लीग २०२१-२२ हंगामात तिसरे स्थान मिळवले. रीड प्रशिक्षक असताना भारतीय संघाने २०१९ मध्ये FIH वर्ल्ड सिरीज फायनल जिंकली. यानंतर भुवनेश्वरमधील ऑलिम्पिक पात्रता स्पर्धा जिंकून तो टोकियो खेळांसाठी पात्र ठरला. रीडसह तिघांचेही राजीनामे स्वीकारताना हॉकी इंडियाचे अध्यक्ष टिर्की म्हणाले, "आम्हाला चांगले निकाल देणाऱ्या ग्रॅहम रीड आणि त्यांच्या संघाचे भारत नेहमीच ऋणी राहील. विशेषतः ऑलिम्पिक खेळांमध्ये. प्रत्येक प्रवासात नवे टप्पे येतात आणि आता आपल्यालाही संघासाठी नव्या विचाराने पुढे जायचे आहे.**

# वर्ल्डकप पराभवानंतर हॉकी इंडियात मोठी खळबळ

## » प्रशिक्षकांनी दिला राजीनामा

**।मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

मायदेशात झालेल्या हॉकी वर्ल्डक 2023 मध्ये भारताच्या पुरूष हॉकी संघाचे क्रॉस ओव्हरमध्येच आव्हान संपुष्टात आले. यानंतर पुरूष हॉकी संघात मोठी घडामोड घडली आहे. संघाचे प्रमुख प्रशिक्षक ग्रॅहम रीड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. रीड यांची भारतीय हॉकी संघाच्या मुख्य प्रशिक्षक पदी एप्रिल 2019 मध्ये नियुक्ती झाली होती. त्याच्या मार्गदर्शनाखाली भारताने टॉकियो ऑलिम्पिक 2021 मध्ये कांस्य पदक पटकावले होते.

ऑस्ट्रेलियाच्या 58 वर्षीय ग्रॅहम रीड यांनी आपला राजीनामा हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांच्याकडे सुपूर्द केला आहे. रीड यांनी राजीनामा देताना सांगितले की, 'आता पदावरून पायउतार होण्याची आणि नव्या व्यवस्थापकाकडे कार्यभार सोपवण्याची वेळ आली आहे.'

ते पुढे म्हणाले की, 'भारतीय संघासोबत आणि हॉकी इंडियासोबत काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. मी या ऐतिहासिक प्रवासाचा प्रत्येक क्षणाचा आनंद घेतला. मी संघाला पुढच्या वाटचालीसाठी

